महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ८३ वे | दिनांक : १६/०३/२०२६ | वार : सोमवार

## बारामती आणि राहुरी विधानसभेसाठी पोटनिवडणूक जाहीर : २३ एप्रिलला मतदान, तर ४ मे रोजी निकाल

**पुणे** : केंद्रीय निवडणूक आयोगाने तामिळनाडू, पश्चिम बंगाल, आसाम, केरळ आणि पुदूचेरी या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे वेळापत्रक जाहीर केले असून, तामिळनाडू, आसाम, केरळ व पुदूचेरीमध्ये एकाच टप्प्यात, तर पश्चिम बंगालमध्ये दोन टप्प्यांत मतदान पार पडणार आहे. या निवडणुकांसोबतच देशातील विविध राज्यांमधील ८ रिक्त जागांसाठी पोटनिवडणुकीची घोषणा करण्यात आली आहे, ज्यामध्ये महाराष्ट्रातील बारामती आणि राहुरी या दोन महत्त्वाच्या विधानसभा मतदारसंघांचा समावेश असून, या दोन्ही जागांसाठी २३ एप्रिल रोजी मतदान आणि ४ मे रोजी मतमोजणी होणार आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी विधानसभा मतदारसंघाचे भाजप आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनामुळे आणि बारामतीचे आमदार तथा माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या २८ जानेवारी रोजी झालेल्या विमान अपघातातील निधनामुळे रिक्त झालेल्या या दोन्ही जागांसाठी आता पोटनिवडणूक जाहीर करण्यात आली आहे. राहुरी आणि बारामती या दोन्ही मतदारसंघांतील लोकप्रतिनिधींच्या अकाली एक्झिटमुळे या जागा रिक्त झाल्या होत्या, ज्यावर आता निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे.

निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार, या निवडणुकीची अधिकृत अधिसूचना ३० मार्च २०२६ रोजी जारी केली जाईल, तर उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी ६ एप्रिल २०२६ पर्यंतची मुदत देण्यात आली आहे. त्यानंतर ७ एप्रिल रोजी अर्जांची छाननी केली जाईल आणि अर्ज मागे घेण्यासाठी ९ एप्रिल ही अंतिम तारीख निश्चित करण्यात आली आहे. प्रत्यक्ष मतदानाची प्रक्रिया २३ एप्रिल २०२६ रोजी पार पडणार असून, ४ मे रोजी मतमोजणी होऊन निवडणुकीचा निकाल स्पष्ट होईल. तसेच ही संपूर्ण निवडणूक प्रक्रिया ६ मे २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

बारामती विधानसभा पोटनिवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसने उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची उमेदवारी निश्चित केली असून, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना या वृत्ताला दुजोरा दिला आहे. विशेष म्हणजे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट या निवडणुकीत आपला उमेदवार रिंगणात उतरवणार नसल्याची माहिती समोर येत असल्याने, बारामतीची ही जागा बिनविरोध होणार की अन्य कोणी अपक्ष किंवा इतर पक्षाचा उमेदवार आव्हान देणार, याकडे आता संपूर्ण राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.भाजपचे राहुरीचे आमदार शिवाजीराव कर्डिले यांचे १७ ऑक्टोबर २०२५ रोजी निधन झाल्यामुळे रिक्त झालेल्या या जागेसाठी आता पोटनिवडणुकीचे बिगुल वाजले असून, महाविकास आघाडी ही निवडणूक पूर्ण ताकदीनिशी लढणार असल्याचे चिन्हे आहेत. या जागेवर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट आपला उमेदवार देण्याची दाट शक्यता असून, माजी आमदार पराजक्त तनपुरे हे शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. दुसरीकडे, सत्ताधारी भाजपकडून कोणाला संधी दिली जाते हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल, कारण दिवंगत आमदारांचे पुत्र अक्षय कर्डिले यांच्या नावाची सध्या राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू आहे.

दरम्यान, बारामती येथील पोटनिवडणुका जाहीर केल्यानंतर शरद पवार गटाचे आमदार रोहित पवारांनी ट्विट करत आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. ते म्हणाले, ज्या निवडणुकीत फक्त मताधिक्याचीच चर्चा व्हायची त्या बारामती मतदारसंघात कधी पोटनिवडणूक घ्यावी लागेल, असे कुणाला स्वप्नातही कधी वाटले नाही.. पण दुर्दैवाने अजितदादा आपल्यातून गेले आणि आज बारामती विधानसभा मतदारसंघासाठी पोटनिवडणूक जाहीर झाली.. कधी कधी वास्तव हे कल्पनेपेक्षाही अधिक भयंकर असते..!

## युनेस्कोच्या यादीतील १२ किल्ल्यांच्या संवर्धनासाठी केंद्राचा मास्टर प्लॅन





**मुंबई** : युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट झालेल्या देशातील १२ ऐतिहासिक मराठा किल्ल्यांच्या संरक्षण, संवर्धन आणि पर्यटन विकासासाठी केंद्र सरकारने तीन टप्प्यांचा सर्वसमावेशक 'साईट मॅनेजमेंट प्लॅन' तयार केल्याची माहिती केंद्रीय संस्कृती व पर्यटन मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांनी राज्यसभेत दिली आहे.

राज्यसभा सदस्य तथा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनी 'विशेष उल्लेख' व प्रश्नाच्या माध्यमातून संसदेत हा विषय उपस्थित केला होता. त्यास लेखी उत्तर देताना केंद्र सरकारने सांगितले की, या १२ मराठा किल्ल्यांचे जतन, पुनर्संचयितीकरण, पर्यटन सुविधा विकसित करणे आणि स्थानिक रोजगारनिर्मिती यासाठी कालबद्ध कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. या आराखड्यात ६ महिने ते २ वर्षांचा अल्पकालीन टप्पा, २ ते ५ वर्षांचा मध्यम कालावधीचा टप्पा आणि ५ ते १० वर्षांचा दीर्घकालीन टप्पा असे तीन टप्पे निश्चित करण्यात आले आहेत.

या तीन टप्प्यांत प्रशासकीय संरचना मजबूत करणे, किल्ल्यांवरील मूलभूत पायाभूत सुविधा उभारणे, पर्यटक मार्गदर्शन व माहिती प्रणाली विकसित करणे, पर्यटन सुविधा वाढविणे, उत्खनन व संवर्धनाची कामे करणे, आपत्ती व जोखीम व्यवस्थापन तसेच किल्ल्यांचे दीर्घकालीन संवर्धन, परिसर व पर्यावरण व्यवस्थापन अशी विविध कामे केली जाणार आहेत. केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे मराठा किल्ल्यांच्या जतनाबरोबरच स्थानिक समुदायाच्या सहभागातून पर्यटनाला चालना मिळण्याची आणि स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मिती होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुढाकारातून जुलै २०२५ मध्ये युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट करण्यात आलेल्या मराठाकालीन किल्ल्यांमध्ये साल्हेर, शिवनेरी, लोहगड, खांदेरी, रायगड, राजगड, प्रतापगड, सुवर्णदुर्ग, पन्हाळा, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग आणि जिंजी या किल्ल्यांचा समावेश आहे.

## अजून किती 'वैष्णवी' मृत्यूला कवटाळणार? : सासरच्या छळाला आणि पैशांच्या मागणीला कंटाळून २२ वर्षीय तरुणीची आत्महत्या



**पुणे** : लोणीकंद येथील बकोरी रोडवरील गोकुळ पार्क परिसरात एका २२ वर्षीय विवाहितेने सासरच्या जाचाला कंटाळून गळफास लावून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. वैष्णवी लाटे असे मृत तरुणीचे नाव असून, सासरी होणाऱ्या सततच्या छळामुळेच तिने हे टोकाचे पाऊल उचलल्याचा गंभीर आरोप तिच्या माहेरच्या मंडळींनी केला आहे. या हृदयद्रावक घटनेमुळे संपूर्ण परिसरात मोठी खळबळ उडाली असून, ऐन उमेदीच्या काळात एका तरुणीने अशा प्रकारे आयुष्य संपवल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे.

वैष्णवीच्या आईने पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार, लग्नानंतरचे सुरुवातीचे काही दिवस सुखात गेल्यानंतर पती यशवंत लाटे आणि सासरच्या इतर मंडळींनी पैशांच्या मागणीसाठी तिचा छळ सुरू केला होता. पतीकडून तिला वारंवार होणारी शिवीगाळ, शारीरिक मारहाण आणि माहेरून पैसे आणण्यासाठी टाकला जाणारा सततचा दबाव, या जाचाला कंटाळूनच तिने हे टोकाचे पाऊल उचलल्याचा गंभीर आरोप या तक्रारीत करण्यात आला आहे. वैष्णवीचे सासू, सासरा आणि दीर यांनी सुद्धा पैशांसाठी तगादा लावला होता. यामुळे वैष्णवी मानसिक तणावात होती. तसेच सासरच्या लोकांकडून मारहाण देखील करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. सततच्या या त्रासाला कंटाळून वैष्णवीने टोकाचे पाऊल उचलले, असा दावा करण्यात येत आहे.

अखेर सासरच्या सततच्या जाचाला कंटाळून १४ मार्च रोजी सकाळी वैष्णवीने राहत्या घरी गळफास घेत आपले जीवन संपवले. या धक्कादायक घटनेची माहिती मिळताच लोणीकंद परिसरात मोठी खळबळ उडाली असून, पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला आणि मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला. याप्रकरणी मृत वैष्णवीच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून लोणीकंद पोलिस ठाण्यात पती, सासू, सासरे आणि दीर अशा चौघांविरुद्ध छळाचा आणि आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस पुढील तपास करत आहेत.

या घटनेमुळे विवाहित महिलांवरील छळाचा आणि हुंडाबळीचा गंभीर प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. लग्नानंतर अवघ्या काही काळातच एका २२ वर्षीय तरुणीला कौटुंबिक छळामुळे आपला जीव गमवावा लागल्याने सर्वत्र संताप व्यक्त केला जात आहे. सासरच्या जाचाला कंटाळून अजून किती 'वैष्णवी' अशा प्रकारे मृत्यूला कवटाळणार? असा संतप्त सवाल या निमित्ताने उपस्थित होत असून, दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १६ मार्च २०२६


## गावाकडची माती

ग्रामीण जीवन साधं, पण सोन्यासारखं खरं
चुलीवरील धुरातही मन समाधानाने भरं
मातीतल्या कणाकणात अन्नाचं वरदान
गावाची माया देते जगण्याला मान

शहरातल्या दिव्यांचा उजेड मोठा दिसे
पण संकट आलं की मन गावाकडे धावे
कोरोनाच्या काळी जेव्हा जग थरथरलं
तेव्हा प्रत्येकाला आपलं गावच आठवलं

धान्याचा तुटवडा झाला, बाजार झाले रिकामे
सिलेंडरच्या रांगेत उभे शहरातील चाकरमाने
बांधावरची सरपण काडी येते आमच्या कामा
गावात आमच्या कुणी उपाशी कधी झोपेना

आज युद्धाची छाया जगावर दाटली
आठवण जणू पुन्हा जागी झाली
शहरातील जीवन पुन्हा अस्थिर झाले
पण गावातल्या मातीने आशेचे दिवे लावले

शहरात उंच इमारती, पण मनं मात्र दूर
गावात माणुसकीचा अजूनही भरपूर पूर
किमान दोन घास मिळतात शेताच्या दारी
म्हणून गावाची माती वाटे जगात भारी

संकट येवो कितीही, काळ बदलो कितीही
गावाचा आधार राहील कायमच सखी
माती, माणुसकी, आणि श्रमाची ही शान
खरंच सांगतो मित्रा — गावच आपली खरी
ओळख, गावच आपला मान

**//काव्य रचना//**
**संदिप नानासाहेब वाकडे**
रा.खेडा ता.कन्नड
9766992776

## आला वसंत आला

आला वसंत आला
मोहरली आमराई
पक्ष्यांचा तो किलबिलाट
सौंदर्याने नटली वनराई

आला वसंत आला
चैतन्य फुलले मनी
कोकिळेची कुहू कुहू
गर्द हिरव्या रानी

आला वसंत आला
गंध फुलांचा सुटे
हिरव्या वृक्षवल्लींना
नवी पालवी फुटे

आला वसंत आला
बहरली जाई जुई
भिरभिरणारे पक्षी
समृद्धीचे गीत गाई

आला वसंत आला
पळस फुलला माळरानी
पाहून निसर्गाचे सौंदर्य
होऊ आनंदाचे धनी



**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

## पिट्टी इंजिनिअरिंग लिमिटेडमध्ये राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह उत्साहात साजरा



**दौलताबाद (जावेद अहमद)** : छत्रपती संभाजीनगर वाळूज औद्योगिक वसाहतीतील पिट्टी इंजिनिअरिंग लिमिटेड, लिम्बेजळगाव येथे राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या सप्ताहाचा समारोप सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या निमित्ताने कर्मचाऱ्यांमध्ये सुरक्षा विषयक जनजागृती वाढविण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाच्या प्रारंभी कंपनीचे प्रेसिडेंट महाराष्ट्र ऑपरेशन्सचे प्रमुख श्री. अविनाश पाटील यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. तर समारोप सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाचे सरसंचालक अधिकारी प्रमोद सुरसे, उपसंचालक महेश भालेकर तसेच वाळूजचे वाहतूक पोलीस निरीक्षक विठ्ठल शिरसाट उपस्थित होते.राष्ट्रीय सुरक्षा सप्ताहाच्या निमित्ताने कंपनीत सुरक्षा विषयक चित्रकला स्पर्धा, निबंध लेखन, कविता, सुविचार स्पर्धा, फायर मॉक ड्रिल, सुरक्षा प्रशिक्षण तसेच ऑनलाईन स्पर्धा अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या सर्व स्पर्धांमधील विजेत्यांना तसेच उत्कृष्ट सुरक्षा नियमांचे पालन करणाऱ्या कर्मचाऱ्यांना विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.या प्रसंगी कंपनीचे वरिष्ठ अधिकारी अविनाश पाटील, राजेंद्र सोनवणे,पंकज धवाडे, सुनील चौधरी, शेखर इमानी, प्रशांत पाटील, जोशी, विनोद, राऊत, रामचंद्र इंगवले तसेच गिरीश चौधरी आणि कंपनीतील सर्व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.समारोप प्रसंगी मार्गदर्शन करताना मान्यवरांनी सांगितले की, सुरक्षा ही केवळ एका आठवड्यापुरती मर्यादित नसून ती प्रत्येक कर्मचाऱ्याच्या दैनंदिन कार्यपद्धतीचा अविभाज्य भाग असली पाहिजे. सतर्कता, शिस्त आणि जबाबदारी यांमुळेच सुरक्षित कार्यसंस्कृती निर्माण होते.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व कर्मचाऱ्यांना मिठाईचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सुरक्षा विभाग प्रमुख रामचंद्र इंगवले यांनी केले. त्यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, सुरक्षा ही केवळ नियमांची अंमलबजावणी नसून ती संस्थेच्या कार्यसंस्कृतीचा आणि प्रत्येक कर्मचाऱ्याच्या सवयीचा महत्त्वपूर्ण घटक असला पाहिजे.

## खेडा येथे उन्हाळी भुईमूग कार्यशाळा चर्चासत्र संपन्न



**कन्नड (अरुण थोरात)** : कन्नड तालुक्यातील खेडा येथे राष्ट्रीय खाद्यतेल अभियान २०२५-२६ अंतर्गत उन्हाळी भुईमूग कार्यशाळा घेण्यात आली. एमजीएम कृषी विज्ञान केंद्र गांधेली येथील शास्त्रज्ञ काकासाहेब सुकासे यांनी भुईमूग पिका विषयी लागवड तंत्रज्ञान ते काढणीपश्चात तंत्रज्ञान याविषयी सविस्तर माहिती दिली, तेथील दुसरे शास्त्रज्ञ तुषार चव्हाण यांनी भुईमूग एकात्मिक पीक व्यवस्थापनातील किडी व रोग याविषयी सविस्तर माहिती दिली. मंडळ कृषी अधिकारी श्री. गायकवाड यांनी महाविस्तार एआय ॲप्स या विषयी सविस्तर माहिती दिली. प्रश्न उत्तर सत्रात शेतकऱ्यांच्या प्रश्नांना उत्तरे देत विविध पिक व्यवस्थापन बाबत शंका समाधान निरासरन केले. सदरील कार्यक्रमात उप कृषी अधिकारी दिनानाथ पाटील,श्री. शिंदे यांनी आभार प्रदर्शन केले. खेडा गावातील कृषी भूषण शेतकरी अजय जाधव, सहाय्यक कृषी अधिकारी जे.बी.पवार, मन्सुबराव वाळुंजे, पोपट दहातोंडे, पोलीस पाटील श्री. शेळके सह गावातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १६ मार्च २०२६

# ट्रॅव्हल अँड टुरिझम शॉर्ट टर्म सर्टिफिकेट अंतर्गत शैक्षणिक सहल




**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. सौ. इं. भा. पा. महिला कला महाविद्यालयाच्या इतिहास विभागातर्फे 'ट्रॅव्हल अँड टुरिझम' या शॉर्ट टर्म सर्टिफिकेट कोर्स अंतर्गत दि. १३ मार्च २०२६ रोजी बी.ए. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थिनींसाठी 'हैद्राबाद मुक्तिसंग्राम : मराठवाड्याची अस्मिता' संग्रहालय येथे शैक्षणिक सहलीचे (स्टडी टूर) आयोजन करण्यात आले.या सहलीस महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनिता बाजपाई यांचे मार्गदर्शन लाभले. सहलीचे नियोजन व आयोजन इतिहास विभाग प्रमुख डॉ. सुषमा देशपांडे, शॉर्ट टर्म सर्टिफिकेट कोर्सचे मार्गदर्शक श्री. सारंग टाकळकर आणि प्रा. कविश्री देशमुख यांनी केले.या प्रसंगी 'हैद्राबाद मुक्तिसंग्राम : मराठवाड्याची अस्मिता' संग्रहालयाची उभारणी ज्यांच्या संकल्पनेवर झाली, तसेच स्वामी रामानंद तीर्थ संशोधन संस्था, छत्रपती संभाजीनगरचे सचिव आणि शॉर्ट टर्म सर्टिफिकेट कोर्सचे मार्गदर्शक मा. श्री. सारंग टाकळकर यांनी विद्यार्थिनींना हैद्राबाद मुक्तिसंग्रामाचा समृद्ध, प्रेरणादायी आणि रोमांचकारी इतिहास सविस्तरपणे उलगडून सांगितला. संग्रहालयातील विविध ऐतिहासिक दस्तावेज, छायाचित्रे आणि वस्तुसंग्रह पाहताना विद्यार्थिनींना मराठवाड्याच्या स्वातंत्र्यलढ्याची जाज्वल्य परंपरा जवळून अनुभवता आली.

सहलीनंतर विद्यार्थिनींनी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त करताना या शैक्षणिक सहलीमुळे त्यांच्या अभ्यासाला निश्चितच मोठी मदत झाली असून इतिहास अधिक जिवंतपणे समजल्याचे सांगितले. अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे विद्यार्थिनींना प्रत्यक्ष अनुभवातून इतिहास समजण्याची संधी मिळते, असेही त्यांनी नमूद केले.एक समृद्ध शैक्षणिक अनुभवाची शिदोरी घेऊन विद्यार्थिनी उत्साहाने परतल्या.

# इराण-इस्त्रायल तणावाचा ग्रामीण बाजारावर परिणाम; सुकेमेव्याचे भाव वाढले



**दौलताबाद (जावेद अहमद) :** इराण, इस्त्रायल, अमेरिका युद्धाचे भारतातील ग्रामीण भागातील बाजारावर परिणाम सुके मेवाचे भाव वाढले गृहिणी चे बजेट कोलमडलेदि १५ रविवारी दौलताबाद बाजारात सुकेमेवा खरेदी करण्यासाठी महिलांची लगबग रमजानपर्व शेवटच्या आठवड्यात. शनिवारी रमजान ईद साजरी होणार आहे. त्यानिमित्ताने मुस्लिम बांधवांची खरेदी बाजारात गर्दी होताना दिसत आहे. रमजान पर्वांच्या तिसऱ्या आणि अंतिम खंडास सुरवात झाली आहे.दौलताबाद गावातील रविवारी बाजारात शिरखुर्यासाठी लागणाऱ्या वस्तू खरेदीसाठी बाजारपेठेत गर्दी दिसत आहे.बहुतांश महिलांनी या वस्तू खरेदीही केल्या आहेत. मात्र यावर्षी अमेरिका, इस्त्राएल, इराण युद्धाच्या परिणाम दिसून येत आहेइराण व अफगाणिस्तान देशातून मोठ्या प्रमाणावर सुके मेवा येत असतातयामुळे महागाई चा खरेदीवर चांगलाच परिणाम झाले ईद सणाची गोडी वाढते ती शिरखुर्म्यामुळे. ईदला अजून काही दिवस बाकी असले तरी घरोघरी शिरखुर्याची तयारी सुरू झाली आहे.शिरखुर्मासाठी खारीक ,खोबरे ,बदाम, काजू, किसमिस, पिस्ता, अक्रोड, शेवया, सुके अंजीर,टरबूज चे बी,खरबूज बी,चारोळी असा सुकामेवा शिरखुर्मासाठी वापरण्यात येतो. त्याचबरोबर मागील वर्षी च्या तुलनेत या वर्षी सुकेमेवा च्या भावा मध्ये भरमसाठ वाढ झाली आहे खोबरे, चोरोळी, खरबूज टरबूज बी पिस्ता यांचे भाव दुप्पट झाले आहेशिरखुर्मा गोड पदार्थावर रोजाचा समारोप केला जातो.त्याचबरोबर शेवया चे भाव सुद्धा वाढले आहेहाताची तयार केलेल्या शेवया ३०० रुपये किलो ने विक्री होत आहेतर मशीन ने तयार केलेल्या शेवया २०० ते २५० रुपये किलो ने विक्री होत आहे

# काहीच कळत नाही

सारेच ओळखीचे तरी मला का अनोळखी वाटे
दुरून सर्व हसतात बोलत मात्र कोणीच नाही

आपले म्हणून मी दु:ख सांगू आता कोणाला
सारे दुरून जातात मला काहीच कळत नाही

स्वार्थी या जगात कोणीच नाही जीवाभावाचे
आता कोणास जीव लावावे काहीच कळत नाही

मी मागेल काही म्हणूनी सारेच दुरून जातात
मी मागत नाही काही त्यांना कसे कळत नाही

आपापल्या धुंदीत सारेच इथे नशेत जगतात
कोणास जवळ घ्यावे आता काहीच कळत नाही

स्वार्थी या जगात मोहमायेत सारेच गुंतलेले
निस्वार्थ माणसाचे बोलणे कोणाला कळत नाही

माणसा तुझे हे वागणे असे कसे बदलून गेले
माणसाला का दूर करतो काहीच कळत नाही

**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

# सोनसरी शिवारात


सोनसरी शिवारात
कसं जोंधळं खुललं
काळ्या भुईच्या कुशीत
जसं चांदणं सांडलं

बळी तुझ्या घामावर
माय मातीचं हे ऋण
जोंधळ्याच्या कणसांत
किती दाटलंय ऊन

भर उन्हात शिवार
वाऱ्यासवे रे डोलतं
माय मातीच्या कानात
काय सांगत गुपित

अशी सुगी जोरदार
रान हरखून गेलं
चिटपाखरांच्या संगे
सारं शिवार हसलं

**ज्ञानेश्वर गायके, कन्नड**



महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १६ मार्च २०२६

# एकल महिलांच्या पुनर्वसनासाठी प्रभावी शासकीय आर्थिक धोरण : गरज, आव्हाने आणि धोरणात्मक शिफारसी

भारतीय समाजात महिला सक्षमीकरणाबाबत अनेक योजना आणि उपक्रम राबवले जात असले तरी विधवा, परित्यक्ता, घटस्फोटित आणि अविवाहित एकल महिलांचे जीवन अजूनही अनेक अडचणींनी वेढलेले आहे. या महिलांना आर्थिक असुरक्षितता, सामाजिक उपेक्षा, मानसिक ताण आणि मुलांच्या संगोपनाची जबाबदारी या अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. त्यामुळे अशा महिलांच्या पुनर्वसनासाठी सुसंगत आणि परिणामकारक शासकीय आर्थिक धोरण राबवणे ही काळाची गरज बनली आहे.एकल महिलांचे पुनर्वसन हा केवळ सामाजिक प्रश्न नसून तो आर्थिक आणि विकासाशी निगडित मुद्दा आहे. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम केल्यास त्यांच्या कुटुंबाचे तसेच समाजाचेही सर्वांगीण विकास साधता येतो.एकल महिलांची स्थिती : सामाजिक व आर्थिक वास्तवभारतामध्ये मोठ्या प्रमाणावर महिला विधवा, परित्यक्ता किंवा घटस्फोटित म्हणून जीवन जगत आहेत. ग्रामीण भागात अशा महिलांची परिस्थिती अधिक कठीण असते. अनेक महिलांना स्थिर उत्पन्नाचे साधन नसते, जमीन किंवा मालमत्तेवर हक्क मिळत नाही आणि कुटुंबाचा आधारही कमी असतो.प्रमुख समस्याआर्थिक असुरक्षितताअनेक महिलांकडे नियमित उत्पन्नाचे साधन नसल्याने दैनंदिन खर्च भागवणे कठीण जाते.सामाजिक उपेक्षाकाही समाजघटकांमध्ये आजही विधवा किंवा परित्यक्ता महिलांकडे वेगळ्या नजरेने पाहिले जाते.मालमत्ता व वारसाहक्क समस्याअनेक वेळा महिलांना कुटुंबातील मालमत्तेवर हक्क मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागतो.मुलांच्या शिक्षणाची जबाबदारीएकल महिलांच्या मुलांना शिक्षणासाठी आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो.आरोग्य आणि मानसिक ताणआर्थिक व सामाजिक दबावामुळे महिलांचे मानसिक आणि शारीरिक आरोग्यही प्रभावित होते.सध्याच्या शासकीय योजना : मर्यादा आणि आव्हानेकेंद्र आणि राज्य सरकारने महिलांच्या कल्याणासाठी अनेक योजना सुरू केल्या आहेत. उदाहरणार्थ :निराधार अनुदान योजनाविधवा पेन्शन योजनास्वयं सहाय्यता गट (SHG)महिला आर्थिक विकास महामंडळाच्या योजनाविविध शिष्यवृत्ती योजनाया योजनांमुळे काही प्रमाणात मदत मिळत असली तरी अनेक महिलांपर्यंत या योजनांचा लाभ पोहोचत नाही.मुख्य अडचणीयोजनांची माहिती नसणेअर्ज प्रक्रिया गुंतागुंतीची असणेकागदपत्रांची कमतरतास्थानिक पातळीवर अंमलबजावणीतील त्रुटीयामुळे योजनांचा अपेक्षित परिणाम दिसून येत नाही.एकल महिलांच्या पुनर्वसनासाठी आवश्यक आर्थिक धोरणएकल महिलांसाठीचे धोरण समन्वित, दीर्घकालीन आणि सर्वसमावेशक असणे आवश्यक आहे. त्यात आर्थिक मदत, रोजगार, शिक्षण आणि सामाजिक संरक्षण या सर्व बाबींचा समावेश असावा.धोरणात्मक शिफारसी१. किमान आर्थिक सुरक्षा योजनाएकल महिलांना आर्थिक स्थैर्य मिळावे यासाठी किमान मासिक उत्पन्नाची हमी देणारी योजना राबवणे आवश्यक आहे. निराधार किंवा विधवा पेन्शनचे प्रमाण महागाईनुसार वाढवणे गरजेचे आहे.२. कौशल्य विकास आणि रोजगार प्रशिक्षणएकल महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी सरकारने मोठ्या प्रमाणावर कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम राबवणे आवश्यक आहे.संभाव्य प्रशिक्षण क्षेत्रे :शिवणकाम आणि फॅशन डिझाइनहस्तकला व लघुउद्योगसंगणक व डिजिटल सेवाशेती व दुग्ध व्यवसायघरगुती उद्योगयामुळे महिलांना रोजगाराच्या संधी निर्माण होऊ शकतात.३. स्वयंरोजगारासाठी सुलभ कर्जसरकारने एकल महिलांसाठी कमी व्याजदराने कर्ज योजना उपलब्ध करून द्याव्यात. महिला बचत गट आणि सूक्ष्म वित्त संस्थांद्वारे महिलांना आर्थिक मदत दिल्यास त्या स्वतःचा व्यवसाय सुरू करू शकतात.४. घरकुल आणि निवारा सुरक्षाएकल महिलांसाठी सुरक्षित निवारा अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यामुळे घरकुल योजनांमध्ये त्यांना प्राधान्यक्रम देणे आवश्यक आहे. ग्रामीण व शहरी भागात विशेष गृहनिर्माण योजना राबवता येऊ शकतात.५. मुलांच्या शिक्षणासाठी विशेष सहाय्यएकल महिलांच्या मुलांसाठी शिक्षण हा महत्त्वाचा मुद्दा आहे.सरकारने पुढील उपाययोजना कराव्यात :शिष्यवृत्ती योजनाशालेय व महाविद्यालयीन फी सवलतवसतिगृह सुविधामोफत शैक्षणिक साहित्ययामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण खंडित होणार नाही.६. आरोग्य व विमा संरक्षणएकल महिलांना आरोग्य सेवा उपलब्ध होण्यासाठी आरोग्य विमा योजना आणि मोफत आरोग्य तपासणी सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.७. कायदेशीर मदत व समुपदेशनपरित्यक्ता किंवा घटस्फोटित महिलांना अनेकदा न्यायालयीन प्रक्रियेचा सामना करावा लागतो. त्यामुळे शासनाने मोफत कायदेशीर मदत आणि समुपदेशन केंद्रे सुरू करणे आवश्यक आहे.धोरणाच्या अंमलबजावणीसाठी उपायधोरण प्रभावीपणे राबवण्यासाठी पुढील गोष्टी आवश्यक आहेत :गावपातळीवर जनजागृती कार्यक्रमअर्ज प्रक्रिया सोपी करणेस्थानिक प्रशासनाने नियमित आढावा घेणेस्वयंसेवी संस्थांशी समन्वय वाढवणेसमाजाची भूमिकाएकल महिलांचे पुनर्वसन हे केवळ सरकारचे काम नाही. समाजानेही या महिलांना सन्मानाने जगण्याची संधी देणे आवश्यक आहे. रोजगाराच्या संधी, शिक्षणासाठी मदत आणि सामाजिक आधार दिल्यास त्यांचे जीवन अधिक सक्षम होऊ शकते.निष्कर्षएकल महिलांचे पुनर्वसन हा सामाजिक न्याय, आर्थिक विकास आणि मानवी सन्मानाचा प्रश्न आहे. मजबूत आर्थिक धोरण, रोजगाराच्या संधी, शिक्षण आणि आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्यास या महिलांना स्वावलंबी बनवता येईल.सरकार, समाज आणि स्वयंसेवी संस्था यांनी एकत्रितपणे काम केल्यास एकल महिलांना सन्मानाने जगण्याचा अधिकार प्रत्यक्षात आणता येईल.हीच खरी महिला सक्षमीकरणाची दिशा ठरेल.



**भगवंत परबतराव पाळवदे**
संस्थापक
एकल महिला व अनाथ बालक पुनर्वसन प्रकल्प

## वयाच्या सातव्या वर्षी श्रद्धेचा पहिला टप्पा पूर्ण केले



**दौलताबाद (जावेद अहमद) :** खुलताबाद पटेलमंडी येथिल आयेशा फकरोदिन सैय्यद पटेल वय सात वर्षे हिने आपल्या जीवनातील पहिला रोजा उपवास पूर्ण केले आहे छोट्या रोजदार तिचे आजोबा, आजी, आई वडील, मामा, काका काकू, आत्या, नातेवाईक यांनी तिचे कौतुक केले आहे

## निधन वार्ता



**दौलताबाद (जावेद अहमद) :** वाळूज - येथील प्रसिद्ध व्यापारी इम्रान खान खलील खान पठाण (४३) रा.जामा मस्जिद परिसर यांचे शुक्रवार दिनांक १३ रोजी रात्री ९:३० वाजता अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांचा दफनविधी शनिवार दिनांक १४ रोजी सकाळी दहा वाजता करण्यात आला. त्यांच्या पाठीमागे आई, वडिल, पत्नी, दोन मुली, एक मुलगा, जावई, नातू असा परिवार आहे. माजी ग्राम पंचायत सदस्य अन्सार खान पठाण यांचे ते जावई होत.



महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १६ मार्च २०२६

# लहान पारंपरिक व्यवसायिकांनाही कर्जमाफीची गरज - दुर्लक्षित समाजघटकाचे उध्वस्थ जीवनमान

**शे**तकऱ्यांची कर्जमाफी हा विषय देशात वारंवार चर्चेत येतो. शेती हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असल्यामुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासन वेळोवेळी कर्जमाफीसारखे निर्णय घेत असतो हे गरजेचे आहे कारण त्यामागील सामाजिक वास्तव नाकारता येत नाही. मात्र शेतकऱ्याप्रमाणेच एक असा समाजघटक आहे कि त्यांना त्यांनी घेतलेल्या कर्जाची परतफेड न केल्याने अनेकांना आत्महत्या कराव्या लागल्या. पिढ्यानपिढ्या त्यांना जमीन नाही पण सेवा करत गावगाड्यात त्यांनी स्वतःच्या पिढ्यानपिढ्या उत्तम सेवा देऊनही उंबरठे झिजवले. किमान मोबदल्यात उत्तम सेवा देण्यासाठी आयुष्य खर्च केले. अजूनही त्यांच्या या परिस्थतीत फारसा फरक पडला नाही या समाजघटकाच्याकडे कायम दुर्लक्ष केल्या गेले. समाज हा परिवर्तनशील आहे याबाबत दुमत नाही. भारतात ही परिवर्तनशीलता काही घटकासाठी लाभदायक नक्कीच झाली पण काही घटकासाठी त्यांच्या जीवनाची राख रांगोळी करणारी ठरली. जगात औद्यागिक क्रांतीने सर्वांगीण परिवर्तन केले. औद्यागिक क्रांती जागतिकस्तरावर कामागारांच्यासाठी संजीवनी ठरली. यंत्रामुळे शारीरिक श्रम काही प्रमाणात हलके झाले. अनेक ठिकाणी शारीरिक कष्टाची जागा यंत्राने घेतली. तर अनेक ठिकाणी सामाजिक स्तररचनेतही बदल झाला. भारतात अलुतेदार — बलुतेदारी अनेक वर्षापासून गावगाड्यात नांदत होती. ही श्रमावर आधारित असणारी स्तररचना होती. शेतकरी म्हणजे कुणबी .या कुणब्यांच्याभोवती फिरणारी ही रचना होती. माणसांच्या व शेतीच्या गरजा गावातल्या गावात पूर्ण केल्या जायच्या. त्यामुळे ही व्यवस्था सेवा तत्वावर आधारलेली होती. या व्यवस्थेचे महत्व किंवा योगदान कोणीही नाकारू शकणार नाही. हा समाजघटक म्हणजे गावगाड्यात अल्प बलुत्यावर पारंपरिक व्यवसाय करणारे छोटे-मोठे कारागीर बलुतेदार, अलुतेदार गावाकसातील आणि गावकुसाबाहेरील श्रमजीवी समाज होय. भारतीय ग्रामीण समाजरचना केवळ शेतीवर उभी नव्हती. ती अनेक शतकांपासून गावातील विविध पारंपरिक व्यवसाय करणाऱ्या समाजघटकांच्या श्रमांवर, घामावर, कबाडकष्टावर आणि त्यांच्या कौशल्यावर उभी होती आणि आजही आहे. न्हावी, सुतार, लोहार, कुंभार, चांभार, माळी, गवंडी, सोनार, धोबी, धनगर, वाणी अशा अनेक व्यवसायांनी ग्रामीण जीवनाचा गाडा सुरळीत चालवला. गावातील प्रत्येक कुटुंबाला या कारागिरांची गरज होती. शेतीची अवजारे तयार करणे, घरबांधणी, लग्नसमारंभ, सण-उत्सव आणि दैनंदिन गरजा या सर्व गोष्टींसाठी गावातील लोक या पारंपरिक कारागिरांवर अवलंबून असत. म्हणजेच ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा केवळ शेतकरी नव्हता तर या पारंपरिक व्यवसायिकांचाही त्यात तितकाच महत्त्वाचा वाटा होता.तथापि, आलुतेदार, बलुतेदार हा बहुसंख्य वर्ग असूनही तो भूमिहीन आहे, सामाजिक रचनेतील विषमतेमुळे हा वर्ग आर्थिक, सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या कधीच सक्षम झाला नाही. काहींना वतनाच्या स्वरूपात थोडी जमीन मिळाली असेल पण मोठ्या प्रमाणात हा समाज परंपरागत व्यवसायांवरच अवलंबून राहिला. त्यांच्या कलेवर आणि श्रमांवर गावाची अर्थव्यवस्था उभी राहिली पण त्यांना स्वतः आर्थिक स्थैर्य कधीच लाभले नाही. पण व्यवस्थेला खरा हादरा बसला तो औद्यागिक क्रांतीनंतर. शारीरिक कौशल्य व श्रम याची जागा यंत्राने घेतली. त्यामुळे गावातील त्यांचे योगदान नाकारण्यास सुरुवात झाली. याचा सर्वात मोठा परिणाम म्हणजे त्यांचे आयुष्य औद्योगिक क्रांतीनंतर अक्षरशः उध्वस्त झाले आहे. पिढ्यानुपिढ्या केले जात असलेले व्यवसाय व त्या व्यवसायावर जगत आलेले त्यांचे कुटुंबच्या कुटुंब रस्त्यावर आले. आलुतेदार -बलुतेदार यांच्यावर हा मोठा हल्ला होता,अचानक आलेले संकट होते ही एक लक्षात न आलेली तुस्नामी होती. औद्योगिक क्रांतीनंतर परिस्थितीत मोठा बदल झाला. यंत्रसामग्री, मोठे उद्योग आणि आधुनिक उत्पादन पद्धतींनी पारंपरिक उद्योगांना अक्षरशः मागे टाकले. बाजारपेठेच्या विस्तारामुळे कारखान्यात तयार होणाऱ्या वस्तू स्वस्त, आकर्षक आणि मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होऊ लागल्या. परिणामी गावोगावी चालणारे छोटे व्यवसाय हळूहळू कोलमडू लागले..या लोकांनाही हे संकट कधीच कळलं नाही. याहीपेक्षा मोठे दुर्दैव या समाजाचं दुःख, वेदना त्यांचा व त्यांच्या कुटुंबाच्या अस्थिरतेचा टाहो समाजातील विचारवंत, अभ्यासक, शासन, राजकीय नेते यांनी याकडे डोळेझाक केली. यापैकी कोणीही याकडे लक्ष दिले नाही. त्यांना यांच्या वेदना दिसल्या नाही. पूर्वी गावातील गरजा भागवणारे कारागीर आता मोठ्या कंपन्यांच्या उत्पादनांपुढे टिकू शकत नाहीत. बाजारपेठेतील स्पर्धा वाढली, पण त्या स्पर्धेला तोंड देण्यासाठी या लोकांकडे भांडवल, तंत्रज्ञान आणि बाजारपेठ यांचा अभाव होता. परिणामी पारंपरिक व्यवसाय संकटात सापडले आणि अनेक ठिकाणी संपुष्टातही आले.खरं तर हा काळाचा त्यांच्यावर घाला होता. हे संकट कोणत्याही नैसर्गिक संकटापेक्षा मोठे होते.या सगळ्या वर्गाला कायम त्यांच्या पारंपरिक व्यवसायापासून विस्थापित व्हावे लागले त्यांचा व्यवसाय कायमचा बुडाला होता. त्यामुळे हा आघात त्यांना सहन न होणारा होता. पण या त्यांच्या संकटाकडे गांभीर्याने कोणीच पाहिले नाही अजूनही बघितले जात नाही. हा सैरा-वैरा झालेला वर्ग आजही त्यांची आर्थिक स्थिरता त्यांच्याच व्यवसायात शोधत आहे. या बदलांचा परिणाम लाखो कुटुंबांवर झाला. अनेक कुटुंबांचे पारंपरिक व्यवसाय जवळपास नष्ट झाले. काहींना रोजगाराच्या शोधात शहरांकडे स्थलांतर करावे लागले. शहरांमध्ये जाऊन त्यांनी मजुरी, लहान-मोठे कामधंदे किंवा असंघटित क्षेत्रातील रोजगार स्वीकारला. काही लोक अजूनही गावात राहून मर्यादित साधनसामग्रीवर व्यवसाय टिकवण्याचा प्रयत्न करत आहेत पण तो प्रयत्न दिवसेंदिवस अधिक कठीण होत चालला आहे.या कारागिरांसाठी सर्वात मोठा प्रश्न म्हणजे भांडवलाचा. त्यांच्या पारंपारिक व्यवसायात अधुनिकतेनुसार बदल झाले. त्यानुसार त्यांना स्वतचे कौशल्य व तंत्रज्ञानात बदल करावा लागत आहे. पण यासाठी भांडवल गरजेचे आहे. आधुनिक साधनसामग्री खरेदी करण्यासाठी किंवा व्यवसायाचा विस्तार करण्यासाठी त्यांच्याकडे पैसे नाही. पूर्वीपासून हा समाजघटक भूमिहीन असल्याने त्यांची आर्थिक पत नाही. त्यामुळे कर्ज मिळणे सुलभ नाही. अलीकडे काही प्रमाणात बँकांकडून कर्ज मिळत आहे. पण यांसाठी कर्ज मिळवणे हा या समाजघटकांसाठी मोठा अडथळा ठरतो. कागदपत्रे, तारण, हमीदार आणि बँकांच्या इतर अटी पूर्ण करणे त्यांना अवघड जाते. काही प्रमाणात विविध महामंडळांमार्फत मदत उपलब्ध असली तरी त्या योजनांचा फायदा सर्वांपर्यंत पोहोचत नाही. कर्ज घेऊन काहीजण स्वतःची रोजी रोटी भागवत आहे. काहींनी हात उसने करत तर काहीनी खाजगी सावकाराच्या जाळ्यात अडकत व्यवसाय उभा करण्याचा प्रयत्न केला. काहींना किंचित यश तर काही जनाचे कुटुंबच्या कुटुंब उध्वस्थ झाले. तर काहीजणांना व्यवसायात थोडेफार नुकसान झाले किंवा उत्पन्न कमी यामुळे हे कर्ज फेडणे अशक्य होते. कर्जाचा बोजा वाढत जातो आणि कुटुंब आर्थिक संकटात सापडते. यातून यांचा सुरु होतो आत्महत्येकडे जाण्याचा प्रवास. देशाच्या अर्थव्यवस्थेत शेतीला कणा मानले जाते आणि म्हणूनच शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे शासन आणि समाजाचे विशेष लक्ष असते. विविध विकास प्रकल्प, महामार्ग, औद्योगिक क्षेत्रे किंवा धरणे उभारण्यासाठी जेव्हा शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या जातात, तेव्हा त्या बदल्यात त्यांना मोबदला दिला जातो. कारण जमीन हीच त्यांची रोजीरोटी असते.परंतु बलुतेदार-अलुतेदार समाजाची रोजीरोटी शेतजमिनीवर नव्हे तर त्यांच्या हातातील व्यवसायांवर अवलंबून होती. आणि आजही पारंपरिक व्यवसायावर आहे. पिढ्यानुपिढ्याचे व्यावसायिक अनुभवावर जगणारा हा व्यावसायिक आपल्या पुढच्या पिढीचे भविष्याही याच व्यवसायात शोधत असतो. काही प्रमाणात आपला पारंपरिक व्यवसाय सोडून इतर व्यवसायात ते जात आहे पण हे प्रमाण नगण्य आहे. बदलेल्या सामाजिक, आर्थिक स्थितीमुळे हा वर्ग सैरावैरा झाल्याने कुटुंबाचे जगवणे त्याला अडचणीचे ठरत आहे. त्यांच्या व्यवसायावर भांडवलदारी वर्गाने शिरकाव केल्याने हा वर्ग पूर्णतः उध्वस्थ झाला आहे. खरं तर न्हावी, सुतार, कुंभार, चांभार, लोहार, माळी, सोनार, तेली, गवंडी, धनगर अशा अनेक पारंपरिक व्यवसायांवर गावगाड्याची अर्थव्यवस्था उभी होती. मात्र औद्योगिकीकरणाच्या लाटेमुळे आणि बदलत्या बाजारपेठेमुळे हे व्यवसाय हळूहळू मागे पडले. मोठ्या उद्योगांनी आणि यांत्रिकीकरणाने या लहान व्यवसायांना स्पर्धेत टिकू दिले नाही.या प्रक्रियेत हजारो कुटुंबांची रोजीरोटी हिरावली गेली. ज्यांच्या हातात कौशल्य होते, ज्यांनी पिढ्यानपिढ्या आपल्या कलेवर जगण्याचा आधार उभा केला होता, त्यांचे उत्पन्नाचे साधनच नष्ट झाले. पण त्यांच्या या नुकसानीचा विचार कोणीच केला नाही. ना मोबदला, ना नुकसानभरपाई, ना पर्यायी रोजगार. आजही ग्रामीण भागात अनेक कुटुंबांनी कर्ज काढून व्यवसाय सुरू ठेवण्याचा प्रयत्न केला. यात बाजारपेठेतील स्पर्धा, नैसर्गिक, मानवी संकट, कौटुंबिक जबाबदारी या सर्वामुळे त्यांच्या व्यवसायावर परिणाम होऊन ते कर्जात अक्षरशः बुडाले.त्यामुळे त्यांच्या डोक्यावर कर्जाचा डोंगर वाढत आहे. यातून त्यांच्यात उदासीनता, निराशा तोंड वर काढते. या आलुतेदार -बलुतेदार यांच्यावर आत्महत्याची वेळ आली आहे. आतापर्यंत बदललेल्या आर्थिक धोरणामुळे अनेक अलुतेदार - बलुतेदार यांनी आत्महत्या केल्या आहे पण त्या आत्महत्या या त्यांच्या पारंपारीक व्यवसाय बुडाल्याने केल्या आहे असा अभ्यास झाला नाही. खरं तर शेतकऱ्यांना कर्जमाफी ही त्यांचा व्यवसाय शेती आहे.त्यात कबाड कष्ट करतो म्हणून त्याला भरपाई म्हणून केली जाते. शेतकऱ्यांइतकाच ग्रामीण जीवनात हा वर्ग पण तितकाच मोलाचा आहे. हे वास्तव असून सुद्धा या वर्गाला समाजातील विचारवंत, बुद्धिवंत, अभ्यासक यांनी वाळीत टाकले की काय असे वाटते. यांच्या डोळ्यातील अश्रू, त्यांच्या मुलाबाळाचे झालेले हाल, होणारे हाल, त्यांच्या डोक्यावरील उडून गेलेले छप्पर,स्थलांतर करावे लागल्यावर त्यांना होणाऱ्या वेदना शासनाला सुद्धा दिसल्या नाही, जाणवल्या नाही. शेतकऱ्यांच्या जमिनी गेल्यावर त्यांना भरपाई मिळते आणि ती मिळायलाच हवी. पण ज्यांच्या हातातील व्यवसायच संपुष्टात आले, त्यांच्या बाबतीत मात्र शासन आणि समाज दोघांनीही आश्चर्यकारक उदासीनता दाखवली.खेदाची बाब म्हणजे या लोकांनीही आपल्या व्यथा,वेदना ताकतीने मांडल्या नाही. हा वर्ग ना पूर्णपणे शेतकरी आहे, ना औद्योगिक कामगार. त्यामुळे त्यांच्या समस्यांना स्पष्टपणे मांडणारे किंवा त्यांच्यासाठी लढणारे व्यासपीठही तयार झाले नाही. परिणामी विकासाच्या प्रक्रियेत सर्वाधिक फटका बसलेला हा वर्ग आजही उपेक्षितच राहिला आहे.या परिस्थितीचा सर्वात मोठा परिणाम त्यांच्या कुटुंबावर आणि मुलांच्या शिक्षणावर होतो. आर्थिक अडचणींमुळे मुलांचे शिक्षण अर्धवट राहते. काही कुटुंबांना दैनंदिन गरजांसाठीही संघर्ष करावा लागतो. निराशा आणि नैराश्य इतके वाढते की काही वेळा कुटुंबप्रमुख आत्महत्येसारखा टोकाचा निर्णय घेतो. अशा घटना ग्रामीण भागात घडतात परंतु त्या फारशा चर्चेत येत नाहीत.या समाजघटकांमध्ये स्वतःच्या प्रश्नांबाबत पुरेशी संघटित जागरूकता निर्माण झालेली नाही, हीदेखील एक मोठी समस्या आहे. शेतकरी संकटात सापडले की त्यांच्या संघटना रस्त्यावर उतरतात, आंदोलने करतात आणि शासनावर दबाव आणतात. त्यामुळे त्यांचा आवाज शासनापर्यंत पोहोचतो. परंतु पारंपरिक व्यवसाय करणाऱ्या कारागिरांच्या बाबतीत असे चित्र दिसत नाही.आज या प्रश्नाकडे गंभीरपणे पाहण्याची गरज आहे. शेतकऱ्यांसाठी जशा कर्जमाफीच्या योजना राबवल्या जातात, त्याचप्रमाणे लहान पारंपरिक व्यवसायिकांसाठीही विशेष धोरण तयार करणे आवश्यक आहे. कर्जमाफी, कर्जपुनर्गठन, कमी व्याजदराचे कर्ज, आधुनिक साधनसामग्रीसाठी अनुदान आणि प्रशिक्षण यांसारख्या उपाययोजना राबवल्या गेल्या तर या लोकांना नव्याने उभे राहण्याची संधी मिळू शकते.तसेच या व्यवसायांना बाजारपेठ उपलब्ध करून देणेही तितकेच महत्त्वाचे आहे. ग्रामीण भागातील पारंपरिक उद्योगांना प्रोत्साहन देणे ही केवळ आर्थिक नव्हे तर सांस्कृतिक गरजही आहे. कारण या व्यवसायांमध्ये आपल्या समाजाचा परंपरागत कौशल्य वारसा दडलेला आहे. जर हे व्यवसाय पूर्णपणे नष्ट झाले, तर त्यासोबत ग्रामीण संस्कृतीचा एक महत्त्वाचा भागही नष्ट होईल. खऱ्या अर्थाने सर्वसमावेशक विकास साधायचा असेल, तर शेतीसोबतच या छोट्या पारंपारिक व्यवसायिकांचाही विचार करावा लागेल. त्यांच्या कर्जमुक्तीचा प्रश्न हा केवळ आर्थिक नाही तो सामाजिक न्यायाचा प्रश्न आहे.शेतकऱ्यांप्रमाणेच लहान पारंपरिक व्यवसायिकांनाही कर्जमुक्तीची संधी दिली, तर त्यांच्या आयुष्यात नव्या आशेचा किरण निर्माण होईल. अन्यथा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा हा विसरलेला कणा हळूहळू कोलमडत जाईल आणि त्याची किंमत अखेर संपुष्टात येईल.



**प्रा. अभय जयभाये**
समाजशास्त्र विभाग
मो. ९९२३५७५५०१